'ग्रीनझोन ॲग्रोकेम प्रा.लि.' संचलित आणि 'पूर्वा केमटेक प्रा.लि.'च्या सहयोगाने, 'बसवंत मधमाशी उद्यान व प्रशिक्षण केंद्र' विविध उपक्रमांसह कार्यान्वित झाले आहे. त्या विषयीचा तपशील प्रस्तुत अंकात दिलेला आहेच. या माध्यमातून गतवर्षीपासून, मधुमक्षिका पालन- संवर्धनासाठी कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सहभाग असलेला राज्यस्तरीय परिसंवाद आयोजिला जातो. तसेच यानिमित्ताने या क्षेत्रात मोलाचे योगदान देणाऱ्यांना विशेष पुरस्कारांनी गौरविण्यात येते. यंदाचा राज्यस्तरीय परिसंवाद (दि. २८ ते ३० ऑक्टोबर २०२०) कोरोना संक्रमणाच्या पार्श्वभूमीवर ऑनलाईन (वेबिनार) होणार आहे. यावर्षीही सत्कारमूर्तींची निवड केलेली असून, त्यांना 'बसवंत मधुक्रांती-२०२०' पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. विभागवार तसेच कार्यानुरुप निवडण्यात आलेल्या या मानकऱ्यांचा परिचय करून देत आहोत.

'मधुक्रांती-२०२०'



योगदान

पुरस्कार : विस्तारकार्य

# प्रशिक्षणातून वाढवत आहेत मधुसेवकांचं 'मोहोळ'



प्रा. उत्तम सहाणे

**प्रा. उत्तम गणपत सहाणे**

**पत्ता**: ३०१, गुलमोहर, ओंकार रेसिडेन्सी, मासोली, ता. डहाणू, जि. पालघर- ४०१ ६०२.

**शिक्षण** : एम.एस्सी. कृषी (कीटकशास्त्र) तसेच 'नेट' परीक्षा उत्तीर्ण (**वय** : ४४ वर्षे)

**संस्थेचे नाव** : कृषी विज्ञान केंद्र, कोसबाड हिल, ता. डहाणू जि. पालघर- ४०१७०३

मधमाशी पालनाच्या संदर्भात प्रा. उत्तम सहाणे यांनी दिलेले योगदान मौलिक आहे. विविध स्तरांवरील मधु प्रशिक्षण शिबिरांद्वारे त्यांनी या क्षेत्रात केलेले प्रचार- प्रसाराचे कार्य अभिनंदनीय म्हटले पाहिजे.

ते गेल्या अकरा वर्षांपासून, म्हणजे सन २००९ पासून मधमाशी पालनाचा प्रचार, प्रसार करण्याचे काम करत आहेत. कृषी विज्ञान केंद्रात पीक संरक्षण तज्ञ म्हणून काम सुरू केले, तेव्हापासून या केंद्रामध्ये मधमाशी पालन युनिट होते. यावर आणखी अभ्यास सुरु केला, कामानिमित ते सतत शेतकऱ्यांच्या शेतावर भेटी देत होते. पालघर जिल्ह्यात मधमाशी पालनाकरिता खूप चांगला वाव आहे हे लक्षात आले. मग कृषी विज्ञान केंद्राच्या प्रक्षेत्रावर शेतकऱ्यांसाठी मधमाशी पालनाचे नियमित प्रशिक्षण द्यायला त्यांनी सुरुवात केली.

प्रत्येक महिन्याला केंद्रावर एक ते दोन प्रशिक्षण शिबिरे घ्यायला सुरुवात केली. तसेच जिल्ह्यात वेगवेगळ्या खेडेगावात जाऊन महिन्याला दोन ते तीन शिबिरे घेऊन मधमाशी पालनाची शास्त्रीय माहिती शेतकरी आणि आदिवासी भागातील लोकांपर्यंत पोहचविण्याचे त्यांचे कार्य गेल्या ११ वर्षांपासून सुरु आहे. केंद्रावर होणाऱ्या प्रशिक्षण शिबिरांसाठी पालघर जिल्ह्यातीलच नाही तर संपूर्ण महाराष्ट्रात लोक येत आहेत. एक वेळा

केंद्रावर प्रशिक्षण दिल्यानंतर गरजेप्रमाणे फोनवर मार्गदर्शन केले जाते. आतापर्यंत केंद्रात, गावात, ऑनलाईन माध्यमे (फेसबुक, झूम, गुगलमीट, मायक्रोसॉफ्ट, वेबेक्स) इत्यादी माध्यमांद्वारे दिलेल्या मार्गदर्शनातून जवळपास साडेपाच हजार लोकांना मधमाशी पालनाचे प्रशिक्षण दिले गेले आहे.

सुरुवातीला एक ते दोन दिवस प्रशिक्षण दिले जायचे. इतर संस्थेतून सुद्धा प्रशिक्षणाची सोय होती. अनुभवातून लक्षात आले की केवळ एक दोन दिवसांच्या प्रशिक्षणातून नवीन मधुमक्षिका पालक तयार होत नाहीत. त्यांनी मधपेट्या घेतल्यानंतर वेळोवेळी मार्गदर्शनाची गरज असते. यासाठी अनेक वेळा नवीन मधुपालकाने पेट्यांची हाताळणी करण्याची गरज आहे. यासाठी त्यांनी प्रत्येक महिन्याला मोफत प्रशिक्षणाची सोय उपलब्ध करून दिली. प्रशिक्षणात तांत्रिक माहितीसोबत प्रात्यक्षिकातून शिक्षण ही पद्धत अवलंबविली. उदा. जंगलातील सातेरी मधमाश्यांच्या वसाहतीची जागा शोधणे, ती वसाहत पेटीमध्ये कशी भरावी, अहिंसक पद्धतीने मधाची काढणी कशी करावी, खराब झालेल्या पोळ्यापासून घरगुती पद्धतीने मेण कसे बनवावे, अशा अनेक गोष्टी प्रात्यक्षिकांच्या रूपाने तरुण शिबिरार्थी करु लागले. यातून आवड आणि आत्मविश्वास वाढला, जिल्ह्यातील नवीन आणि जुने मधुपालक प्रत्येक महिन्यात ठरलेल्या दिवशी भेटी देत असत. यातून त्यांचा आत्मविश्वास वाढत गेला आणि सुरुवातीला मधमाशीजवळ जायला घाबरणारे लोक सहज मधमाश्या हाताळू लागले. यातून नवनवीन मधुपालक तयार होत गेले.

मुंबईहून अनेक महाविद्यालयांतील विद्यार्थी कृषी विज्ञान केंद्रात अभ्यास दौरा, राष्ट्रीय सेवा योजना तसेच एन.सी.सी.च्या माध्यमातून ते भेटी देत असत. या विद्यार्थ्यांना मधमाशीची माहिती तसेच परागीभवनासाठी आवश्यक असलेल्या मधमाशीचे महत्त्व पटवून देत असत. पदवीनंतर सर्वच विद्यार्थ्यांना नोकरी मिळत नाही.
खेड्यातील आणि शहरी भागातील विद्यार्थ्यांना हा व्यवसाय हे उपजीविकेचे साधन बनू शकते हे लक्षात आले. त्यामुळे जिल्ह्यातील शाळा आणि महाविद्यालयांत जाऊन मधमाशी पालनाचे धडे त्यांनी दिले. यातून विद्यार्थी मधुपालक बनले. काही जणांनी विरार- वसईसारख्या शहरांत एक दोन सातेरी माश्यांच्या पेट्या घेऊन मधमाशी पालन सुरु केले.

आज व्हॉट्सअप हे प्रभावी माध्यम आहे. या माध्यमाद्वारे मधुपालकांचे १० ग्रुप बनविले असून, यातून राज्यातील अनेक शेतकरी आणि मधुपालक त्यांचा समस्या पाठवत असतात. संदेश, फोन व फोटोद्वारे त्यांच्या समस्यांचे निराकरण केले जाते. यातून नवीन मधुपालकांना हंगामानुसार पेटीची हाताळणी, मधाची काढणी, मेणाची निर्मिती, विक्री व्यवस्था इत्यादी माहिती ग्रुपद्वारे पुरविली जाते. त्यामुळे नवीन मधुपालकांचा आत्मविश्वास वाढण्यास नक्कीच मदत होत असते.

पालघर, ठाणे जिल्ह्यासोबत कोकण तसेच महाराष्ट्रातील नाशिक, पुणे, सांगली, सोलापूर, कोल्हापूर येथील अनेक शेतकरी महिन्याच्या प्रशिक्षणाला आवर्जून येत आहेत. यामागे कारणही तसेच होते. ते म्हणजे सातेरी मधमाशी पालनाचे प्रशिक्षण कोसबाडच्या कृषी विज्ञान केंद्रात छान दिले जाते. या प्रशिक्षणाला शेतकऱ्यांसोबत महात्मा फुले कृषी विद्यापीठांतर्गत राहुरी, पुणे, धुळे, नाशिक येथील प्राध्यापक आणि विद्यार्थी यांनीही भेटी दिल्या असून, त्याचा पुढे प्रसार करण्याचे मोठे काम केले आहे. परिसरातील आणि जिल्ह्यातील शाळा आणि महाविद्यालयांत जाऊन प्रशिक्षणाद्वारे अन्ननिर्मितीमधील मधमाशीचे महत्त्व व मधनिर्मिती याबद्दल मार्गदर्शन दिले जाते. आजपर्यंत अकरा वर्षांत जवळपास साडेपाच हजार

युवक युवती आणि शेतकऱ्यांपर्यंत मधमाशी पालनाचे ज्ञान पोहचविण्याचे मोठे काम श्री. सहाणे यांनी केले आहे. यातील पालघर जिल्ह्यातील काही शेतकरी, ज्यांच्याकडे आधीच्या मधपेट्या होत्या परंतु पूर्ण ज्ञान नसल्यामुळे ते स्वतः पेटी तपासू शकत नव्हते, असे अनेक लोक आता उत्साहाने मधमाश्यांच्या पेट्या हाताळण्याचे काम करू लागले. त्यातून शेतकरी आंबा, लिची, नारळ, भाजीपाला या पिकांच्या परागीभवनासाठी मध्यमाश्यांचा उपयोग करू लागले. तसेच अनेक नवीन तरुणांनी मधमाशी पालन हा आपला पूरक व काहींनी मुख्य व्यवसाय म्हणून हे काम स्वीकारले.

गोखले एज्युकेशन संस्थेच्या कोसबाडमधील कृषी विज्ञान केंद्रामध्ये मधमाशी पालन युनिट असल्यामुळे शेतकरी, तरुणांना प्रशिक्षण देण्याची सोय झाली. येथील सर्व कर्मचाऱ्यांची मदत मिळाल्यामुळे हे काम अधिक सोपे झाले. प्रक्षेत्रावर प्रशिक्षणाची योग्य सोय होती. तसेच डहाणूमध्ये खादी ग्रामोद्योग आयोगाचे कार्यालय आहे. तेथील कर्मचाऱ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळाला व मदत झाली. या भागात अनेक आदिवासी शेतकरी आहेत जे आधीपासून या व्यवसायात होते. वेळोवेळी त्यांच्याकडे जाऊन माहिती घेत होतो. त्यातून नवीन नवीन गोष्टींची माहिती मिळत गेली. या सर्वांचा उपयोग त्यांचे ज्ञान वाढण्यासाठी झाला. त्याचा त्यांना शेतकरी आणि तरुण वर्गाला अधिक चांगले प्रशिक्षण देण्यासाठी उपयोग झाला.

या क्षेत्रात अजूनही खूप कमी संस्था काम करत आहेत. शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीतून अधिक उत्पादन मिळण्यासाठी आणि त्याचबरोबर शुद्ध मधाचे उत्पादन मिळावे यासाठी जास्तीत जास्त तरुणांना प्रशिक्षित करणे आवश्यक होते आणि आहे. हा विचार केल्यानंतर आपण कृषी विज्ञान केंद्राच्या अंतर्गत हे काम सहज करु शकतो, असे श्री. सहाणे यांच्या लक्षात आले. हे काम महाराष्ट्रातील एकही कृषी विज्ञान केंद्रात सुरु झाले नव्हते. त्यामुळे सुरुवातीला या गोष्टी त्यांना वरिष्ठांना समजावून सांगाव्या लागल्या व त्यानंतर परवानगी मिळाली. महिन्यातून एक दिवस प्रशिक्षण घेणे त्यांनी सुरू केले. याबद्दल काही पुस्तके उपलब्ध होती. मात्र प्रात्यक्षिक शिकविणाऱ्या प्रशिक्षकांची कमी होती. म्हणून स्वतःच अभ्यास व माहिती घेऊन सराव करत करत वेगवेगळ्या गोष्टी शिकणे सुरु केले. उदा. जंगलातील नैसर्गिक मधमाशी वसाहती पेटीत भरणे, मधाची काढणी करणे, पेट्यांची साफसफाई करणे इत्यादी. एक गोष्ट लक्षात आली की अडचणी येत असतात. परंतु चांगले काम करण्याची जिद्द ठेवली तर हळूहळू सर्वजण मदतीला येत असतात. अशाच प्रकारे नाशिकमधील 'ग्रीनझोन ॲग्रोकेम प्रा.लि.' ही संस्था देखील परागीभवनाचा फायदा शेतकऱ्यांना करून देण्यासाठी प्रयत्नशील आहे. अशा विविध संस्था तसेच नाशिकमधील डॉ. तुकाराम निकम सरांच्या पुस्तकातून त्यांना मार्गदर्शन मिळाले.

मधमाशी पालनाकडे जास्तीत जास्त तरुण आकर्षित झाले पाहिजेत यासाठी, विविध महाविद्यालयांत जाऊन तेथील तरुण विद्यार्थ्यांना मधमाशी पालनाचे महत्त्व पटवून देण्याचे काम श्री. सहाणे यांनी याआधीपासून सुरु केले आहे. तसेच विज्ञान महाविद्यालयातील प्राणीशास्त्र व वनस्पतीशास्त्र विभागात कायमस्वरुपी मधमाशी केंद्र असायला हवे यासाठी प्रयत्न सुरु आहेत. यासोबतच जिल्ह्यात कृषी विज्ञान केंद्रातील विविध उपक्रमांतून मधमाशीचे पीकवृद्धीतील महत्त्व शेतकऱ्यांना पटवून सांगितले जाते. यातून अनेक बेरोजगार तरुण या व्यवसायात आले आहेत. हीच गोष्ट महाराष्ट्रातील इतर कृषी विज्ञान केंद्रांना तसेच कृषी विद्यापीठात विविध चर्चासत्रांतून सांगितली जात आहे. त्यातून राज्यात अनेक ठिकाणी

प्रशिक्षण केंद्रे सुरु होतील, असा विश्वास ते व्यक्त करतात. ज्यावेळी प्रत्येक जिल्ह्यात आणि तालुक्यात मधमाशी पालनाचे नियमित प्रशिक्षण केंद्र सुरू होईल त्यावेळी प्रत्येक इच्छुक तरुणाला प्रशिक्षण मिळेल व गावोगावी अनेक शेतकरी व तरुण मधमाशी पालन करतील. याचप्रमाणे शहरी भागातील लोकांची मधमाशीबद्दलची भीती व गैरसमज दूर केले जाऊ शकतात. आज शहरांमध्ये आग्या मधमाश्यांचे पोळे आढळल्यास भीतीपोटी या मधमाश्या पेस्ट कंट्रोलद्वारे (कीटकनाशकांनी) मारल्या जातात अथवा ही पोळी जाळून नष्ट केली जातात. हे लक्षात घेता मधमाश्यांबद्दलची यासंबंधीची भीती आणि गैरसमज दूर व्हायला हवा, यासाठी ते जागृती करत आहोत. त्याचप्रमाणे जंगल परिसरात आग्या मोहोळांची कत्तल करुन मध काढण्याचा सपाटा सुरू आहे. या लोकांना अहिंसक पद्धतीने मध काढण्याची कला प्रशिक्षण देऊन शिकवली जाते.

डंखरहित माशी म्हणजे कोती किंवा ट्रायगोना या मधमाशीबद्दल जास्त संशोधन झाले नाही. खरे तर या जातीची मधमाशी छोट्या फुलांचे परागीभवन करण्यासाठी तसेच पॉलिहाऊसमधील भाजीपाल्याचे परागीभवन करण्यासाठी अतिशय उपयोगी आहे. तसेच डंख नसल्याने हाताळणीसाठी निर्धोक आहे. याविषयी प्रचार व प्रसाराचे काम सुरु आहे. यापासून मिळणारे प्रोपोलिस हे औषधी गुणधर्माचे असून यावर संशोधन सुरु आहे. शहरातील लोक कुत्री, शोभिवंत मासे किंवा लव्हबर्डस्‌सारखे पक्षी पाळतात. त्यांच्या जोडीला डंखहीन माश्यांच्या पेट्या ठेवून नैसर्गिक वातावरण तयार करता येऊ शकते. अशा प्रकारे आपण नवीन-नवीन मधुपालक बनवू शकतो, असा त्यांना विश्वास आहे.

मधमाश्यांना आकर्षित करण्यासाठी उपयोगी फुले असलेल्या वनस्पतींची लागवड मधुबनात केली आहे. यामध्ये अजून काही वनस्पती आहेत, त्यातून वर्षभर मधमाश्यांना मकरंद व पराग मिळेल. अशा वनस्पतींची निवड करण्याचे काम सुरू आहे. एखाद्या मधुबनात सुंदर देखावा आणि त्यासोबतच मधमाश्यांना त्या वनस्पतीचा फायदा कसा होईल याविषयी त्यांचे काम सुरु आहे.

मधमाशी पालनाबद्दल सांगायचे झाल्यास शेतकऱ्यांमध्ये आणि सर्वच क्षेत्रात जागृती करण्याची खूप गरज आहे. यातील शेतकऱ्यांबद्दल विचार केला तर परागीभवनासाठी मधमाशी का महत्त्वाची आहे याबद्दल अजूनही हवी तेवढी जागृती झालेली नाही. या क्षेत्रात काम करण्यास मोठा वाव आहे. हे काम केले तरच शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी मधमाशीची मदत घेता येईल. मधमाशी पालनातून मध आणि इतर महत्त्वाची उत्पादने मिळतात. आपल्या देशात फक्त मध हेच मुख्य उत्पादन म्हणून बघितले जाते. परदेशात ज्याप्रमाणे पराग, प्रोपोलिस, रॉयल जेली, मधमाशीचे विष या उत्पादनांनाही महत्त्व आहे. तसे आपल्याकडे व्हायला हवे. यासाठी आपल्या देशात संशोधन व प्रशिक्षण आणि ज्ञानाचा प्रसार करण्याला खूप मोठी संधी व त्याची गरज आहे. यासाठी देशातील कृषी विद्यापीठांमध्ये खास विभाग तयार केला पाहिजे. यावर संशोधन केले पाहिजे.

मधमाशीविषयी अनेक वेगवेगळ्या कोनांतून उपयोगितेनुसार संशोधन होणे गरजेचे आहे. राज्यात ४४ तर देशात ७२० कृषी विज्ञान केंद्रे आहेत. प्रत्येक केंद्रात मोठ्या प्रमाणात मधमाशी पालन प्रशिक्षण नियमित सुरू होणे गरजेचे आहे. असे झाले तरच मधमाशी प्रत्येक शेतकऱ्याच्या शेतात आणि तयार झालेला शुद्ध मध प्रत्येक भारतीयांच्या घरात पोहोचेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. ■

'मधुक्रांती-२०२०'



## योगदान

पुरस्कार : महिला श्रेणी

# 'फॉरेस्ट हनी'च्या माध्यमातून जिद्दीनं झाल्या 'यशस्विनी'



सौ. रोहिणी पाटील

**सौ. रोहिणी प्रकाश पाटील** (मो.नं. : ७५८८६८५७३७)
**शिक्षण** : १२ वी (**वय** : ३१) **पत्ता** : नाडे नवारस्ता, ता. पाटण, जि. सातारा

एखादा पूरक व्यवसाय सुरू करण्याची इच्छा असेल तर मार्ग निघतोच. असाच काहीसा प्रयत्न **सौ. रोहिणी प्रकाश पाटील** (नाडे- नवा रस्ता, ता. पाटण, जि. सातारा) यांनी केला. बाजारपेठेची मागणी, तांत्रिक अभ्यास आणि जिद्दीच्या जोरावर पाटील यांनी महिला गटाच्या माध्यमातून मधमाशी पालनास सुरुवात केली. अलीकडे बाजारपेठेत त्यांच्या 'फॉरेस्ट हनी' या ब्रॅण्डने वेगळी ओळख तयार केली आहे.

सौ. रोहिणी प्रकाश पाटील या २०१४ पासून मधमाशी व्यवसाय करीत आहेत. त्यांच्याकडे सातेरी जातीच्या मधमाश्यांच्या ५० वसाहती आहेत. मधमाश्यांना वाचवणे व त्यांचे महत्त्व पटवून देणे हा प्रमुख उद्देश मधमाशी पालन व्यवसाय करण्याचा आहे. दरवर्षी त्या ३०० ते ३५० किलो मधाचे उत्पादन घेतात. शेतकऱ्यांना परागीभवनासाठी १० ते १५ वसाहती (शेवगा लागवड व सेंद्रिय शेती करणाऱ्या ५ ते ६ शेतकऱ्यांना) त्या देतात. स्वत:च्या ब्रॅण्डने मधविक्री करणे हे त्यांचे नियोजन आहे. हा व्यवसाय सुरू करण्यासाठी त्यांनी कोणत्याही बँकेकडून कर्जसाहाय्य घेतलेले नाही. मधमाश्यांच्या पेट्यांची संख्या वाढवून माश्यांचे संवर्धन करण्याबरोबरच 'फॉरेस्ट हनी' या ब्रॅण्डला मोठे करून मध उत्पादन व्यवसायात झेप घेण्याचे त्यांचे भविष्यकालीन नियोजन आहे.

मधाच्या उत्पादनाबरोबर बी वॅक्स, पोलन कलेक्शन, रॉयल जेली आणि परागीभवन व शेती उत्पादन वाढीसाठी मधमाश्यांचा व्यवसाय खूप उपयुक्त आहे. निसर्ग जपण्यासाठी याचा खूप फायदा होईल, असे त्यांना वाटते.

सातारा जिल्ह्यातील पाटण तालुका हा डोंगराळ असल्याने मोठ्या प्रमाणात वनसंपदा आहे. या तालुक्यात सर्वाधिक भात लागवड होती. परंतु अलीकडे पाण्याची उपलब्धता झाल्याने ऊस, भाजीपाला पिके, फळबागांच्या क्षेत्रात चांगली वाढ झाली. सौ. रोहिणीताईंचे पती नोकरी करत असल्याने त्यांनी शेतीची जबाबदारी स्वत:कडे घेतली. त्यांच्या कुटुंबाची दोन एकर शेती आहे. परंतु शेतजमीन कमी असल्यामुळे उत्पन्नवाढीसाठी त्यांनी शेतीपूरक व्यवसायाचा शोध सुरू केला. या दरम्यान बचत गट उभारणीसाठी माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर यांच्याशी झालेल्या चर्चेतून मधमाशी पालनाला पाटण तालुक्यात चांगला वाव असून बाजारपेठेतही संधी असल्याचे लक्षात आले. त्यादृष्टीने सौ. रोहिणीताईंनी मधमाशी पालनाचा अभ्यास सुरू केला.

### मधमाशी पालनाला सुरुवात

महिला गटाच्या माध्यमातून मधमाशी पालन हा पूरक व्यवसाय सुरू झाला. हळूहळू त्यातील बारकावे लक्षात आले. प्रत्येक वेळी मधमाश्यांच्या पेट्या भरून आणाव्या लागत होत्या. त्यामुळे त्यांनी पुढाकार घेऊन मधमाश्यांच्या पेट्या स्वत: तयार करण्याचे ठरविले. यासाठी खादी ग्रामोद्योगमधील

तज्ञ श्री. बल्लाळ यांचे मार्गदर्शन मिळाले. सुरुवातीच्या काळात नव्याने पेटी भरताना मधमाश्यांनी चावे घेतल्यामुळे चेहरा, त्वचेवर सूज यायची. तरी हिंमत न हरता सौ. रोहिणीताईंनी मधमाशी पालनाचे काम सुरुच ठेवले. राणीमाशी ओळखण्यापासून ते स्वत: मधमाश्यांची वसाहत तयार करण्यास सुरुवात केली. मधमाश्यांची वसाहत यशस्वी झाल्यावर सौ. रोहिणीताईंनी स्वत:च्या ५० पेट्या गावाजवळील जंगलाच्या परिसरात ठेवण्यास सुरुवात केली. सुरुवातीच्या काळात वर्षभरात दोनशे किलो मध मिळाला. त्यानंतर टप्प्याटप्प्याने ६०० किलो मधाची त्यांनी योग्य पद्धतीने साठवणूक केली. एका पेटीतून एका वर्षात सरासरी सात किलो मध मिळतो. पहिल्या टप्प्यात त्यांनी स्थानिक हॉटेल तसेच परिसरात होणाऱ्या प्रदर्शनांतून मध विक्रीला सुरुवात केली.

मधमाशी पालनासाठी सौ. रोहिणीताईंना दैनिक ॲग्रोवनमधील माहितीचा चांगला उपयोग झाला. याचबरोबरीने माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर, वडील तसेच मधुगंध शेतकरी महिला गटातील सुवर्णा पाटणकर, जयश्री बनसोडे, शोभा कदम, रेखाताई पाटील, शीलादेवी पाटणकर, उज्ज्वलादेवी पाटणकर, सविता पाटील, नीलिमा शेडगे, भारती सुतार, शशिकला हदवे, संध्या शिंदे, शोभा कदम तसेच खादी ग्रामोद्योग, कोयना ॲग्रो इंडस्ट्रिजमधील तज्ञांची चांगली मदत मिळाली. त्या परिसरातील शेतकऱ्यांकडे मधमाशी पालनाबाबत मार्गदर्शनासाठी जातात. त्यांच्या मधमाशी पालन उद्योगाला इंग्लंड-ऑस्ट्रेलियातील पर्यटकांनीही भेटी दिल्या आहेत. मधाचे उत्पादन वाढविण्यासाठी त्यांनी एपिस मेलिफेरा मधमाशीच्या ७० पेट्या मागविल्या आहेत. या पेट्या राजस्थान, गुजरात येथील मधपाळांकडे ठेवून मधाचे संकलन करणार असल्याचे त्यांनी नमूद केले. ■

---

‘मधुक्रांती-२०२०’



## योगदान

पुरस्कार : विदर्भ विभाग

# आग्या माश्यांसाठी रानोमाळ भ्रमंती; कष्टांची गोडी हीच खरी श्रीमंती



रामप्रसाद ठाकरे

**रामप्रसाद गोदरुजी ठाकरे,** सिंदिविहिरी, ता. कारंजा, जि. वर्धा (महाराष्ट्र)

**श्री. रामप्रसाद गोदरुजी ठाकरे** हा व्यवसाय मागील १५ वर्षांपासून करीत आहेत.

ते आग्या मधमाश्यांवर काम करतात. त्यांचे संगोपन करता येत नाही. उन्हाळ्याच्या सीझनमध्ये ते त्यांच्या मोहोळांपासून मधाचे उत्पादन घेतात. आग्या मधमाश्यांचा बचाव व्हावा व त्यांची संख्या वाढावी म्हणून ते उत्पादन, प्रशिक्षण व प्रचारकार्य करीत आहेत. परिसरातून त्यांचा गट ४००-५०० किलो मध उत्पादन करतो.

ते परागीकरणासाठी मधमाश्या देत नाहीत. मधाची विक्री ते मधमाशी विकास केंद्र, वर्धा येथे करतात.

हा व्यवसाय सुरू करण्यासाठी त्यांनी कर्ज घेतले नाही. मध उत्पादनासाठी साधन सामग्री त्यांना सरकारतर्फे अनुदान म्हणून मधमाशी विकास केंद्र, वर्धा यांच्या माध्यमातून मिळाली. दरवर्षी जास्तीत जास्त मध उत्पादन घेणे व प्रशिक्षण कार्य चालू ठेवणे हे नियोजन असल्याची माहिती त्यांनी दिली.

आग्या मधमाश्यांची हाताळणी कठीण व काबाडकष्टांची आहे. वनविभागाने यासाठी साह्य, प्रोत्साहन व सवलत दिली तर बरे होईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. ■



योगदान

पुरस्कार : कोकण विभाग

# परागीभवनातून वाढेल पिकांचा वंश; ‘मधु’संगोपनाचा हाच सारांश!



प्रकाश पाटील

**श्री. प्रकाश विश्वनाथ पाटील** (मो.नं. : ९२७१७७८५७९)
**शिक्षण** : कृषी पदवीधर (**वय** : ६५)
**विश्वनाथ सातेरी मधुमक्षी संशोधन, ट्रेनिंग व विक्री केंद्र**
मु. नागझरी (ज्ञानवाडी), पो. पोयनाड, ता. अलिबाग, जि. रायगड

**श्री. प्रकाश पाटील** यांनी २० मे २०१९ पासून प्रत्यक्ष व्यवसायास सुरुवात केली. त्यांच्याकडे सातेरी मधमाश्यांच्या पाच वसाहती आहेत. प्रत्येकाच्या घरी / शेतावर सातेरी मधामाशीची पेटी असावी व त्यातून त्याला मध मिळावा व तो मध खाऊन त्याचे व परिवाराचे आयुष्यमान वाढावे व परिसर निसर्गस्नेही असावा, हा त्यांचा हेतू आहे. एका पेटीतून ४ ते ५ किलो मध मिळतो आणि सदर पेट्या ते स्वतःच्या शेतावर ठेवतात. कारली, दुधी, शिराळी व शेवगा या पिकांच्या परागीभवनासाठी ३ वसाहती ३ शेतकऱ्यांना दिल्या आहेत. उत्पादित मध ते स्थानिक लोकांना विकतात, पुढे मध उत्पादन वाढविण्याचा विचार आहे. यावरील लागणारा खर्च ते स्वतः करतात. स्वतः मधुबन तयार करणे व स्वतः कडील ज्ञान इतरांना देऊन शेतकऱ्यांच्या उत्पादनात वाढ करून देण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. प्रत्येक शेतकऱ्यास प्रशिक्षण देणे गरजेचे आहे

प्रत्येक शेतकऱ्याने १ पेटी ठेवणे आवश्यक आहे. हानिकारक कीटकनाशके वापरू नयेत. अनुदानाच्या योग्य नियोजनाची व्यवस्था होणे गरजेचे आहे. कोकणात फक्त सातेरी मधमाशा व डंखहीन मधमाशांचे पालन करावे. सदर माशांना स्थलांतराची आवश्यकता नाही, त्याकरिता योग्य नियोजन आवश्यक आहे, असा त्यांचा अभिप्राय आहे. ते अलिबाग तालुक्यात शेतकऱ्यांच्या प्रशिक्षणात मार्गदर्शन करतात. सदर प्रशिक्षणात मडक्यातून कॉलनी पेटीत भरणे व मध काढणे हे प्रात्यक्षिक दाखवले जाते. तसेच कृषी खात्यातील कर्मचाऱ्यांना व शेतकऱ्यांना रामेती येथे प्रशिक्षण दिले जाते.

आपला संशोधन केंद्र सुरू करण्यामागचा हेतू त्यांनी याप्रमाणे क्रमवार नमूद केला.

१) सातेरी मधमाश्यांचे ब्रीडिंग सेंटर. २) महाराष्ट्रातून विविध ठिकाणांहून सातेरी मधमाश्या आणून चांगल्या कॉलनीची निवड करून त्यापासून कॉलनी तयार करणे. ३) शेतकऱ्यांना व इतरांना मधमाश्यांचे ट्रेनिंग देणे. ४) शेतकऱ्यांना व इतरांना मधपेट्या व वसाहत पुरविणे. ५) शेतकऱ्यांना व इतरांना मधमाश्यांचे साहित्य पुरविणे. ६) शेतकऱ्यांना व इतरांना माफक दरात पेट्यांची देखभाल करणे. ७) शहरात ब्लॉकच्या बाल्कनीत मधमाश्या पालन करणे. ८) शहरात टेरेस गार्डन व टेरेस मधुबन करणे. ९) शहरातील गार्डनमध्ये मधुबन करणे. १०) स्वत: मधुबन तयार करणे, स्वत:कडील ज्ञान इतरांना देऊन शेतकऱ्याच्या उत्पन्नात वाढ करण्याचा प्रयत्न करणे. ११) परदेशी आधुनिक तंत्रज्ञान येथे आणून त्याचा वापर सातेरी मधमाश्यांमध्ये वापरून त्याचा प्रसार करणे.

पृथ्वीवर मानवाला सापडलेला पहिला गोड पदार्थ म्हणजे मध हा होय. याचा उपयोग मानव अन्न व औषध म्हणून करत आहे. हा मध आपणास मधमाश्यांपासून मिळतो. या मधमाश्यांचे पाच प्रकार दिसून येतात.





त्यातील भारतीय सातेरी व परदेशी मेलिफेरा मधमाश्यांचे संगोपन आपण करू शकतो. या मधमाश्यांपासून आपणास मध, पराग हा फुलातून गोळा करतात. त्यामुळे पिकांचे पराभीगवन होते. त्यामुळे पिकाच्या फळधारणेत २० ते ४० टक्के वाढ होऊन उत्पादनात वाढ होते, ही शेतकऱ्याच्या दृष्टीने महत्त्वाची बाब आहे.

मधमाश्यांच्या समूहात एकच राणी असून तिचे तिचे वसाहतीवर नियंत्रण असते. तिच्या आदेशाप्रमाणे कामकरी माश्या जन्मापासून मरेपर्यंत विविध कामे २४ तास करतात. या माश्यांपासून मानवाने एकसंध राहाणे, कामांमधील शिस्त, कामांच्या वाटणीप्रमाणे २४ तास काम करणे हे शिकण्यासारखे आहे, असे त्यांनी म्हटले आहे.

मधमाश्यांपासून आपणास मध, मेण, पराग, विष व राजान्न हे पदार्थ मिळतात. त्यास भरपूर मागणी आहे. मानवाच्या पिकांवरील औषधांच्या अतिवापरामुळे मधमाश्यांचे प्रमाण कमी होऊ लागले आहे. म्हणून औषधाचे योग्य नियोजन व सेंद्रिय शेती करणे ही काळाची गरज आहे. अन्यथा वनस्पतींच्या काही प्रजाती नष्ट होतील व शेतकऱ्यांचे उत्पन्न कमी कमी होत जाईल. म्हणूनच मधमाश्या पालन करणे ही काळाची गरज आहे. तसेच मधमाश्यांची पोळी जाळून मध गोळा न करता, योग्य व अहिंसक पद्धतीने मध गोळा करावा. त्याकरिता प्रशिक्षण आवश्यक आहे, असे ते आवर्जून सांगतात. ■

'मधुक्रांती-२०२०'



## योगदान

पुरस्कार : संस्थात्मक श्रेणी

# गडकिल्ल्यांशी दोस्ती, विविधांगी उपक्रम मधुसंगोपनाचा फलदायी अभ्यासक्रम!



विजय महाजन

**श्री. विजय ओंकार महाजन**
शिवसागर मध उद्योग, तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि. पुणे

**श्री. विजय महाजन** यांनी 'गिरिभ्रमण' या सामाजिक संस्थेची स्थापना स्थापना सन १९८० मध्ये केली. किल्लेभ्रमण, आदिवासी लोकांना रोजगार उपलब्ध करून देणे, त्याद्वारे मधउद्योग, बेहडा, हिरडा, जांभूळ पावडर तयार करून बाजारपेठ उपलब्ध करून देणे, अशी उद्दिष्ट्ये यामागे आहेत.

**'शिवसागर मध उद्योग समूहा'**तर्फे मध उद्योगाचे प्रशिक्षण देऊन त्यांनी आदिवासी बांधवांना मधमाशी पालनाचे महत्त्व सांगितले. त्यांच्याकडून मध, हिरडा, बेहडा, जांभूळ पावडर, आवळा पावडर इत्यादींसाठी बाजारपेठ उपलब्ध करून दिली जाते. त्यांच्या शिवसागर उद्योगाशी संलग्न असलेल्या संस्थांची यादी अशी आहे. १) मधमाशी रिसर्च सेंटर २) लायन्स क्लब, तळेगाव दाभाडे ३) रूडसेड इन्स्टिट्यूट, तळेगाव दाभाडे ४) रोटरी क्लब, पिंपरी चिंचवड ५) कृषी संशोधन केंद्र, वडगाव मावळ ६) विज्ञान आश्रम, मु.पा. पाबळ, ता. शिरुर, जि. पुणे ७) जैन इरिगेशन, जळगाव ८) सेवाधाम ट्रस्ट आश्रमशाळा, माळेगाव ९) मराठवाडा कृषी विज्ञान केंद्र, खरपुडी, जालना १०) प्रतीक्षा लोकसंचालित साधन केंद्र, अभोणा, ता. कळवण, जि. नाशिक. त्याचप्रमाणे शिवसागर उद्योगातर्फे गुजरात, कर्नाटक, त्रिपुरा, महाराष्ट्र, आसाम, अरुणाचल प्रदेश, बिहार, काश्मीर इत्यादी राज्यांमध्ये कौशल्यविकास योजनेंतर्गत भारत सरकारच्या माध्यमातून मधमाशी पालन, प्रशिक्षण व मधापासून तयार होणारे इतर पदार्थ यांची निर्मिती- प्रात्यक्षिके करून घेतली जातात, असे त्यांनी सांगितले. ■

‘मधुक्रांती-२०२०’



# योगदान

पुरस्कार : उत्तर महाराष्ट्र विभाग

# देशभर ‘मधु’पर्यटन करणारे सेवाव्रती ‘मास्टर ट्रेनर’



विष्णू जंगले

**विष्णू गोविंदा जंगले**
(मो.नं. : ९७६६२९६३३१)
**शिक्षण** : एम.ए. (अर्थशास्त्र), **वय** : ३१
**पत्ता** : जळगाव, ता. जि. जळगाव (महाराष्ट्र)

**श्री. विष्णू जंगले** ५ वर्षांपासून मधमाशी पालन करीत आहेत. सध्या त्यांच्याकडे २५० वसाहती आहेत व सहकाऱ्याच्या मिळून ४५० वसाहती आहेत. या माध्यमातून शेतकऱ्यांच्या पिकांचे परागीभवन होऊन आपल्याला त्यापासून मध, पोलन, मेण, प्रोपोलिस इत्यादीद्वारे उत्पन्नाचा चांगला स्त्रोत तयार होतो, असे त्यांनी सांगितले. मध उत्पादन हे वसाहतीवर निर्भर असते पण साधारणतः वर्षाकाठी ५ टनांपर्यंत मध मिळते. यात निलगिरी, मोहरी, सूर्यफूल, धनिया, सुळी घास (कोंबडा गवत), बरसिम, अजवाइन, किकर इत्यादी पिकांचा समावेश असतो. प्रथमतः राजस्थान, उत्तर प्रदेश, हरियाणा, पंजाब, हिमाचल प्रदेश, महाराष्ट्र, झारखंड येथे ‘मधु-पर्यटन’ केल्याचे त्यांनी सांगितले.

शेतकऱ्यांपैकी काही जण २ ते ५ वसाहती पाहिजे असे म्हणतात. परंतु २५ ते ५० वसाहती हव्या असतील तर त्यांना देतो. डाळिंब, शेवगा, कांदे बी याकरिता. ते आपल्याला सोयीस्कर असते, असे त्यांनी नमूद केले. नाबार्डने अर्थसाह्य दिले. नॅशनल बी बोर्ड यांच्या सौजन्याने महत्त्वाची मदत झाली. (एन.एच.एम. अंतर्गत.)

पुढील नियोजनाचे सांगायचे झाले तर शेतकऱ्यांसाठी जी काही मदत, माहिती देता येईल तितकी त्यांना मधमाशी पालन संदर्भात द्यायची, असे त्यांनी सांगितले.

हा उद्योग इतर उद्योगांपेक्षा चांगला आहे. कारण नवनवीन व्यक्ती आपल्याला भेटतात. आपले संबंध इतर राज्यांत वाढतात. एरवी आराम खूप होतो पण आपले सण ज्यावेळेस असतात नेमके त्यावेळेस खूप काम असते, असे ते म्हणाले.

या मधु-सेवा व्यवसायात काळानुरुप आधुनिकता अंगिकारणे; उत्तम दर्जाचे उत्पादन घेणे असे त्यांचे भावी नियोजन आहे.

उल्लेखनीय काम केले म्हणून ‘कृषी इनोव्हेशन समिट: २०१८’ मध्ये (आज तक वाहिनी) गौरविण्यात आले. श्री. राधामोहन सिंह (केंद्रीय कृषिमंत्री, भारत सरकार यांच्या हस्ते सत्कार झाला.

**इतर माहिती** : २०१५ ला सुरवात केली. त्यानंतर २०१६ पासून नॅशनल बी बोर्डचे मास्टर ट्रेनर म्हणून उत्तर भारत, ऑल स्टेट आसाम, उत्तर प्रदेश, राजस्थान, गुजरात, हरियाणा, जम्मू काश्मीर, छत्तीसगड, झारखंड, कर्नाटक, उडिसा, महाराष्ट्र यांच्यासह पूर्ण भारतात टी.जी.एस. या संस्थेद्वारे मधमाशी पालनबद्दल माहिती, प्रॅक्टिकलद्वारे त्यांनी मार्गदर्शन केले. ■

'मधुक्रांती-२०२०'



## योगदान

**पुरस्कार : मराठवाडा विभाग**

# सृष्टिसंवर्धनाला हातभार; मध उत्पादनातून रोजगार



ज्ञानेश्वर मलिले

**श्री. ज्ञानेश्वर शिवाजीराव मलिले** (मो.नं. : ७०३०३०९००७)

**शिक्षण**:बी.कॉम. (**वय**: २९) शिरोळ (जातापूर), ता. उदगीर, जि. लातूर. **फर्म** : भगीरथ मध उद्योग

**श्री. ज्ञानेश्वर शिवाजीराव मलिले** चार वर्षांपासून मधमाशी पालन करत आहेत. पिकांची हेक्टरी सरासरी उत्पादकतेपेक्षा कमी आहे. उत्पादन वाढवण्यासाठी मधमाश्या आवश्यक आहेत. मधमाश्या राष्ट्राच्या अन्नाची गरज भागवण्यासाठी अप्रत्यक्ष उपयुक्त ठरतात. त्याचबरोबर उत्कृष्ट दर्जाचा मधही लोकांपर्यंत पोहोचतो, असे हेतुकथन ते नमूद करतात. त्यांच्याकडे एपिस मेलिफेरा जातीच्या ४०० वसाहती आहेत. मधमाश्यांचे संगोपन, निसर्गातल्या मधमाश्या वाढवणे, निसर्गाचे संवर्धन करणे व मधमाशी पालन व्यवसायातून नवीन रोजगार निर्मिती करणे. तसेच उत्कृष्ट दर्जाचा मध बाजारात विक्रीसाठी आणणे, हा त्यांचा उद्देश आहे. आम्ही वर्षाकाठी ८ टन मधाचे संकलन करतो. त्यासाठी महाराष्ट्र, राजस्थान, मध्य प्रदेश, हरियाणा, जम्मू या राज्यांचे कार्यक्षेत्र असल्याचे त्यांनी सांगितले. ते शेतकऱ्यांना परागीभवनासाठी पेट्या देतात. २५० वसाहती कांदा, डाळिंब, शेवगा, टरबूज या पिकांसाठी परागीभवनासाठी भाडेतत्त्वावर वसाहती देतात. काढलेला मध गाळून १ किलो, ५०० ग्रॅम, २५० ग्रॅम, १०० ग्रॅम बॉटल पॅकिंग करून लोकल मार्केटमध्ये दिला जातो. यासाठी पंजाब नॅशनल बँकेकडून अर्थसाह्य घेतले व जिल्हा उद्योग केंद्राकडून अनुदान घेतले. प्रत्यक्ष शेतकऱ्यांपर्यंत मधमाश्यांचे परागीभवनातील महत्त्व पोहोचावे यासाठी त्यांच्या संवर्धनाची आवश्यकता पटवून देण्याची गरज आहे. त्यादृष्टीने कार्य करावे लागेल, अशी माहिती त्यांनी दिली. ■

---

'मधुक्रांती-२०२०'



## योगदान

**पुरस्कार : पश्चिम महाराष्ट्र विभाग**

# 'मधुर' उद्योगनिष्ठा जपल्याने लाभली सामाजिक प्रतिष्ठा



राजू कानवडे

**श्री. राजू भाऊसाहेब कानवडे** (मो.नं. : ९५५२१५७४७८)

**शिक्षण** : बी.ए. (इंग्लिश) (**वय**: ३२) अंबड, ता. अकोले- ४२२६०१, जि. अहमदनगर

**श्री. राजू भाऊसाहेब कानवडे** बी-ब्रीडर्सच्या माध्यमातून २००८ पासून व्यवसायात आहेत. त्यांच्याकडे इटालियन मेलिफेरा जातीच्या ७५० पेट्या, कोते (ट्रायगोना) २५ पेट्या आहेत. यामागे पिके/ फळझाडे परागीभवन, मध व इतर उपउत्पादने हा उद्देश असून मध २५ मे. टन (महाराष्ट्र, कर्नाटक, राजस्थान, मध्य प्रदेश, हरियाणा, केरळ) अशी एकूण उत्पादकता आहे. जानेवारी ते जुलै या कालावधीत भाडेतत्त्वावर मधपेट्या उपलब्ध होतात. प्रामुख्याने डाळिंब, इतर फळझाडे, कांदा बियाणे, वेलवर्गीय पिके इत्यादीसाठी ५०० मधपेट्या. शेतकरी- २००० ते २५०० या परागीभवन सेवेचा लाभ घेतात, असे त्यांनी सांगितले. महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग महामंडळ, महाबळेश्वर. स्थानिक विक्री- बॉटल पॅकिंग, कृषी प्रदर्शन/ मेळावे- स्टॉलमधून विक्री, ठोक मधपॅकर, विक्रेते यांना मधविक्री केली जाते. भारतीय स्टेट बँक शाखा- अकोले, जि. अहमदनगर यांच्याकडून अर्थसहाय्य मिळाले आहे. तसेच ५२ गुंठे रोडलगत प्लॉट खरेदी केला असून, तेथे 'सात्विक ग्रामीण बहुउद्देशीय संस्थे'च्या माध्यमातून नवयुवकांना प्रशिक्षण, मध प्रोसेसिंग प्लॅन्ट, इतर उपउत्पादने असे नियोजन असल्याची माहिती त्यांनी दिली. याद्वारे त्यांनी सुशिक्षित बेरोजगारीवर मात केली. इतरांनाही रोजगार उपलब्धता, शेतकरी, शेती उत्पन्न यात भरीव वाढ होऊन त्यांना आर्थिक स्थैर्य, सामाजिक प्रतिष्ठा लाभली, असे त्यांनी नमूद केले. ■